# बृहन्मुंबई महानगरपालिका
## विधि खाते
**परिपत्रक क्र.कायदा अधिकारी/२ दिनांक १५.०२.२०२०**

विषय: महानगरपालिकेस प्रतिवादी केलेल्या किंवा महानगरपालिकेतर्फे दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाबाबत तसेच जनहित याचिका इत्यादीबाबत प्रत्यक्ष संबंधित अधिकारी व महानगरपालिकेचे वकील यांच्यामध्ये न्यायालयीन निर्णयाची किंवा इतर न्यायालयीन बाबींची माहिती कळविण्यासाठी व संबंधित खाते व विधि खाते यांचेमध्ये समन्वय साधण्यासाठी ''संपर्क अधिकारी (Nodal Officers)'' नेमणूक करण्याबाबत.

बृहन्मुबई महानगरपालिकेशी संबंधित मा.उच्च न्यायालयात दाखल होणाऱ्या विविध याचिका व न्यायालयीन विधिप्रकरणांत विधि विभागाकडे संबधित न्यायालयीन प्रकरणांत संबंधित खाते / विभागांकडून माहिती न मिळाल्यामुळे अथवा संबधित अधिकारी माहिती देण्यासाठी वेळेवर हजर न राहील्यामुळे, महानगरपालिकेचे सहायक कायदा अधिकारी तसेच संबंधित विधिज्ञ हे पूर्ण क्षमतेने याचिका/ न्यायालयीन प्रकरणांत मनपाची बाजू प्रभावीपणे मांडू शकत नसल्याचे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे व त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे वेळेत निकाली काढणे मा.न्यायालयांस देखील शक्य होत नाही.

तसेच, विधि विभागाने वेळोवेळी मा.उच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश कळविलेले असून देखील सदर आदेशांची अंमलबजावणी संबंधित खाते अथवा विभागाने केल्याचे दिसून येत नाही. यामुळे वेळोवेळी मा.न्यायालयाने त्यांची नाराजी दर्शविलेली आहे.

वरील तत्सम परिस्थितीत काही याचिकांत मा.उच्च न्यायालयाने मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या निदर्शनास सदर बाब आणण्याचे आदेश दिले असून देखील सदर बाबतीत काही सुधारणा न झाल्यामुळे एका याचिकेत मा.उच्च न्यायालयाने मा.महानगरपालिका आयुक्त यांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते.

सदरहू याचिकेच्या सुनावणीच्या वेळी मा.महानगरपालिका आयुक्तांनी मा.उच्च न्यायालयास सांगितले की, महानगरपालिकेच्या विविध विभागांचा विधि विभागांशी समन्वय योग्य तऱ्हेने होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलली जातील व न्यायालयीन प्रकरणांतील विलंब टाळण्याच्या हेतूने ठोस कार्यवाही केली जाईल.

मा.महानगरपालिका आयुक्तांनी केलेले वक्तव्य मा. उच्च न्यायालयाने गांभीर्याने घेतले आहे.

अ) तरी, उपरोक्त परिच्छेदांत नमूद परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी व विधि विभाग आणि इतर संबंधित खाते / विभाग / कार्यालये / रुग्णालय यामध्ये समन्वय साधून न्यायालयीन प्रकरणांत मनपाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे विहित कालावधीत पालन करण्याकरिता खालीलप्रमाणे "संपर्क अधिकारी (Nodal Officers)" नेमण्यात येत आहेत.

| अ. क्र | कार्यालये / खाते / विभाग | संपर्क अधिकारी (Nodal Officers) |
|---|---|---|
| 1 | सर्व विभाग (Wards) कार्यालये | कार्यकारी अभियंता (Executive Engineer) |
| 2 | प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन) | उप प्रमुख अभियंता (Dy. Chief Engineer-1&2 for D.P.)<br>उप प्रमुख अभियंता (Dy. Chief Engineer(B.P.) City , Dy. Chief Engineer W.S. I & II, Dy. Chief Engineer E.S. |
| 3 | मालमत्ता खाते | प्रशासकीय अधिकारी (Administrative Officer) |
| 4 | नगर अभियंता खाते | कार्यकारी अभियंता (Executive Engineer) |
| 5 | अग्निशमन दल | विभाागीय अग्निशमन अधिकारी (Div. Fire Officer) |
| 6 | जल अभियंता | उप प्रमुख जल अभियंता (Deputy Chief Hydraulic Engineer) |
| 7 | अन्य खाते/रुग्णालये/शिक्षण खाते | संबंधित खातेप्रमुख/ अधिष्ठाता/ शिक्षणाधिकारी |

ब) सदर परिपत्रकान्वये प्रत्येक खाती/विभाग/कार्यालये/रुग्णालये यांनी नियुक्त केलेल्या "संपर्क अधिकाऱ्यांची (Nodal Officers)" माहिती खाली दिलेल्या तक्त्यात विधि खात्याकडे पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | संपर्क अधिकारी (Nodal Officers) यांचे नाव | पदनाम | कार्यालयीन पत्ता | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

क) तसेच, संबंधित मनपा वकील तथा सहायक कायदा अधिकारी व विधिज्ञ यांची सविस्तर माहिती **"संपर्क अधिकारी (Nodal Officers)"** यांना वेळोवेळी विधि खात्याने खाली देण्यात आलेल्या तक्त्यानुसार देण्यात यावी.

| अ.क्र | न्यायालये व याचिका संदर्भ | मनपा वकीलांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल | संबंधित विधिज्ञ यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल |
|---|---|---|---|
| | | | |

ड) **''संपर्क अधिकारी (Nodal Officers)'' यांची कर्तव्ये व जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:**

1) विधि खात्यास प्राप्त झालेली दाव्याची / याचिकेची कागदपत्रे (Proceeding)/ समन्स / नोटीस (सूचना) सर्व संबंधित संपर्क अधिकारी (Nodal Officers) यांना विधि विभागातर्फे प्राप्त झाल्यानंतर तात्काळ अग्रेषित करण्यात येतील.

2) संपर्क अधिकारी (Nodal Officers) यांनी विधि खाते व संबंधित खाती/विभाग/ कार्यालये/ रुग्णालये यांच्यामधील दुवा म्हणुन काम करावयाचे आहे. तसेच, त्यांनी सदर न्यायालयीन प्रकरणांशी संबंधित विभागातील सर्व खात्यांशी व उपविभागांशी समन्वय साधून माहिती गोळा करून विधि खात्यास उपलब्ध करून देतील.

3) मा.न्यायालयाकडून येणारे समन्स/ सूचना तसेच महानगरपालिका वकील/ विधि खाते यांचेकडून सूचना/समन्स प्राप्त झाल्यानंतर त्वरीत आवश्यक माहिती ही लेखी स्वरुपात महानगरपालिका वकील/विधि खाते यांना पाठविण्याची जबाबदारी संबंधित संपर्क अधिकारी (Nodal Officers) यांची राहील.

4) मा.उच्च न्यायालयातील आपल्या संबंधित खात्यातील प्रकरणांमध्ये आवश्यक लेखी माहिती ही महानगरपालिका वकील/विधि खाते यांना पाठविलेली आहे किंवा नाही व सदर न्यायालयीन प्रकरणांमध्ये प्रतिज्ञापत्र अथवा लेखी जबाब महानगरपालिकेतर्फे सादर केला आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करण्याची संपूर्णपणे जबाबदारी संबंधित संपर्क अधिकारी (Nodal Officers) हयांची राहील.

5) न्यायालयीन प्रकरणांमध्ये संबंधित खात्यांकडून परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Remarks ) घेऊन ते महानगरपालिका वकील/विधि खाते यांचेकडे पाठविण्याची जबाबदारी संबंधित संपर्क अधिकारी (Nodal Officers) हयांची राहील.

6) न्यायालयीन प्रकरणांमध्ये न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी केली आहे किंवा कसे याची पडताळणी करण्याची जबाबदारी संबंधित संपर्क अधिकारी (Nodal Officers) हयांची असेल.

7) न्यायालयीन प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे संबंधित खात्यातील संबंधित अधिकारी हे संबंधित संपर्क अधिकारी (Nodal Officers) यांच्याबरोबर न्यायालयात हजर राहतील याची पूर्णपणे खातरजमा करण्याची जबाबदारी संपर्क अधिकारी (Nodal Officers) ह्यांची असेल.

८) सर्व संपर्क अधिकारी (Nodal Officers) ह्यांनी आपल्या कार्यकक्षेत असलेल्या त्यांच्या अखत्यारीतील सर्व न्यायालयीन कागदपत्रांचा अभिलेख जतन करण्याची जबाबदारी पार पाडावी.

९) सर्व सहाय्यक आयुक्त/ सर्व खातेप्रमुख/ कार्यालय प्रमूख /अधिष्ठाता/ मुख्य अभियंता यांनी नियमित वेळेत संपर्क अधिकारी (Nodal Officers) यांचेकडून उच्च न्यायालयातील प्रकरण बाबत पुनर्विलोकन करून त्याचा आढावा घेणे.

इ) सदर परिपत्रकान्वये सर्व खातेप्रमुख/विभाग अधिकारी/कार्यालय प्रमुख/अधिष्ठाता यांना आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या खाते/विभाग/कार्यालये/रुग्णालये इत्यादींकरीता त्यांच्या अखत्यारीतील ''संपर्क अधिकारी (Nodal Officers)'' यांनी त्यांचेवर सोपविलेल्या जबाबदाऱ्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर परिपत्रक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (14.02.2020) | (14.02.2020) | (14.02.2020) |
| **(अरुणा सावला)** | **(आशुतोष सलिल)** | **(प्रवीण परदेशी)** |
| **कायदा अधिकारी** | **सह आयुक्त (दक्षता)** | **महानगरपालिका आयुक्त** |

**प्रत -----------------------------------------------------------**

**यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.**

अ.मा. सावला
१५/२/२०२०
**कायदा अधिकारी**
**विधि खाते**